नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १०/१०/२०२५ ( शुक्रवार )**

---

## ड्रोन कॅमेऱ्या द्वारे पेट्रोलींग करून जेसीबी च्या सहायाने अवैधरित्या मोहाफुल दारू काढणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई, २ गुन्हे नोंद, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :—दिनांक १०/१०/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, उमरेड पोलीस स्टेशन हद्दीतील दहेगाव ( पारधी बेडा) येथे मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आणि श्रीमती वृष्टी जैन, सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक ,प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन उमरेड यांनी उमरेड पोलीस स्टेशन चे अधिकारी आणि अंमलदार यांचे पथकासह जावुन **ड्रोन कॅमेऱ्याद्वारे पेट्रोलींग करून घटनास्थळी जावुन जेसीबी चा वापर करून मोहाफुल सडवा रसायनाचे ड्रम काढुन कारवाई केली**. नमुद कारवाईत २ महीला आरोपी यांच्या ताब्यातुन पंचासमक्ष मोहाफुल रसायन सडव्याने भरलेले एकूण आठ ड्रम किमती १२,००० हजार, वरील सर्व ड्रम मधील एकूण १६०० किलो मोहा फुल रसायन सडवा किमती ५६,००० /— रुपये, ११५ लिटर मोहाफुल दारू किमती ५,७५० /— रुपये, भट्टीवर वापरण्यात आलेले इतर साहित्य २२६० /— रुपये, असा एकूण **७६,०१० /— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला**. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट

करण्यात आला. दोन महीला आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये २ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.





## पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत सराईत गुन्हेगार मनोज चैतराम चिमनकर याला एम.पी.डी.ए. कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत राहणारा सराईत आरोपी नामे **मनोज चैतराम चिमणकर, वार्ड क्रं ६ संताजी नगर, कन्हान कांद्री** याचेवर स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम अन्वये १ गुन्हा तसेच अवैध जुगाराचे ५ गुन्हे नोंद आहे. सदर आरोपी हा गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. नागपुर ग्रामीण पोलीसांनी त्याचेविरूध्द कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी मनोज चैतराम चिमणकर याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने कन्हान पोलीसांकडुन एम.पी.डी.ए. कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दिनांक ०९/१०/२०२५ रोजी मा.जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत गुन्हेगार मनोज चैतराम चिमणकर याचे विरूध्द १ वर्षा करीता मध्यवर्ती कारागृह नाशिक येथे स्थानबध्दतेता आदेश काढला असता कन्हान पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन दिनांक ०९/१०/२०२५ रोजी त्याला मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले आहे.




**मनोज चैतराम चिमणकर**

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद आरोपी अटक, सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक ०८/१०/२०२५ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, मध्यप्रदेश येथुन प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस चौकी ,पाटणसांवगी समोर रोडवर नाकाबंदी केली असता चारचाकी सुपर कॅरी टर्बो वाहन क्र एम.एच ४९ ए.टी ४६९४ येतांना दिसले. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला सुगंधीत तंबाखु मिळुन आाला. वाहन चालक आरोपी नामे किशोर गणेशराव इंगळे वय ४८ वर्ष, रा. गुजर नगर गंगाबाई घाट नागपुर, जि नागपुर याचे ताब्यातुन वेगवेगळया कंपनीचे प्रतिबंधीत सुगंधित तंबाखु आाणि पानमसाला एकुण वजन ७७.४० किलोग्रॅम किंमती ८८,७००/— रूपये आणि चारचाकी वाहन क्र एम.एच ४९ एटी ४६९४ किंमती ४,००,०००/— रूपये असा एकुण ४,८८,७००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.नमुद आरोपीकडे चौकशी केली असता वाहन माल आरोपी नामे अर्जुन उर्फ अजय मीश्रा, रा.शांती नगर, नागपुर याच्या सांगण्यावरून सदर प्रतिबंधीत सुगंधित तंबाखु पांढुर्णा राज्य मध्यप्रदेश येथुन आणल्याची माहीती प्राप्त झाली.

नमुद आरोपीतांनी सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपी विरूद्ध पोस्टे सावनेर येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपी क्रं १ याला पोलीसांनी अटक केली आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्याा सात आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ०९/१०/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की मौजा ठाणा शिवार येथे काही इसम ५२ , ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे.मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता आरोपी नामे १) अमोल रणवीर धनविजय, वय ३० वर्षे, रा. ठाणा तह. उमरेड, २) अक्रम अहमद खॉ पठाण, वय ५५ वर्ष, रा. कारगाव तह उमरेड, ३) अमोल श्रीकृष्ण डडमल, वय ३४ वर्ष, रा. ठाणा तह. उमरेड, ४) सोनु प्रकाश चाचेरकर, वय २९ वर्ष, रा. ठाणा, तह.उमरेड, ५) अमित दामोदर गेडेकर ,वय २३ वर्ष, रा. ठाणा तह. उमरेड, ६) अखील नंदलाल मेश्राम, वय ३२ वर्ष, रा. वार्ड क्र ३ अखील पेठ, नागपुर, ७) सागर रणवीश उके, वय २३ वर्ष, रा. ठाणा, तह. उमरेड हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तास पत्ते व नगदी एकुन मिळालेला माल ४०३०/रूपये जप्त करण्यात आले आहे. नमुद ७ आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन उमरेड येथे १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**